# शेतमालाचा संभाव्य किंमत अहवाल



CONTENTS



मका



तूर



हरभरा



सोयाबीन



कापूस



कांदा

**मका:** USDA ने २०२२-२३ मध्ये भारताचे मक्याचे उत्पादन ३४६ लाख मेट्रिक टन होईल असा अंदाज वर्तवला आहे, जो २०२१ च्या तुलनेत ३ टक्क्यांनी जास्त आहे.

**तूर:** तूर आणि उडदाचे मोफत आयात धोरण ३१ मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आले आहे, असे परकीय व्यापार महासंचालनालयाने डिसेंबर २०२२ मध्ये सांगितले.


**हरभरा:** नाफेडने ०८ मे २०२३ पर्यंत एकूण १०,७१,१४२ मेट्रिक टन हरभऱ्याची खरेदी केली आहे. एकूण खरेदीपैकी महाराष्ट्राने ६२४४५३ मेट्रिक टन, गुजरातने ३२३१६३ मेट्रिक टन, कर्नाटकाने ७८८१० मेट्रिक टन, एपीने ६३३७९ मेट्रिक टन, उत्तर प्रदेशातून ८२११ मेट्रिक टन आणि तामिळनाडूने ३३४ मेट्रिक टन खरेदी केली आहे.

**सोयाबीन:** अमेरिकन कृषी विभागाच्या (USDA) WADSE अहवालानुसार (एप्रिल २०२३), जागतिक सोयाबीन उत्पादन ५.५ दशलक्ष टनांनी कमी होऊन ३६९.६ दशलक्ष टन होण्याची शक्यता आहे, याचे मुख्य कारण अर्जेंटिना आणि उरुग्वे या देशातील दुष्काळी परिस्थितीमुळे सोयाबीनचे उत्पादन अंदाज मागील महिन्याच्या तुलनेत कमी केले आहे. तसेच, अर्जेंटिनामध्ये सोयामील आणि सोयाबीन तेल उत्पादनात घट झाल्यामुळे सोयामील आणि सोया तेलाचे जागतिक उत्पादन अंदाज मागील महिन्यापेक्षा कमी नोंदविले आहे.


**कापूस:** कॉटन असोसिएशन ऑफ इंडिया (CAI) च्या पीक समितीने आयोजित केलेल्या चर्चेनुसार, वर्ष २०२२-२३ हंगामासाठी ८.५० लाख गाठींनी उत्पादनाचा अंदाज कमी करून ३१३ लाख गाठी इतका ठेवला आहे. भारतातील कापूस आयातीचा अंदाज १२ लाख गाठींचा आहे. समितीने ३० लाख गाठींचा कापूस निर्यातीचा अंदाज कायम ठेवला आहे. समितीने ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत २६.८९ लाख गाठींच्या साठ्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

टीप: सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा


**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात मागील वर्षाच्या तुलनेत ६ टक्के मक्याचे उत्पादन कमी होण्याच्या अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मका निर्यात २०२१-२२ मध्ये ३४ लाख टन झाली होती त्यामध्ये चालू वर्षी २०२२-२३ मध्ये ६ लाख टनांची वाढ होऊन ती ४० लाख टन होईल असा अंदाज आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याच्या उत्पादनात ३ टक्के वाढ होईल असा अंदाज आहे त्यामध्ये मुख्यतः खरिपात मका उत्पादन सुमारे ५ टक्क्यांनी जास्त असेल, मात्र प्रतिकूल हवामानामुळे भारतातील गेल्या वर्षीच्या तुलनेत रब्बीमध्ये उतपादन २.४ टक्के कमी होईल.




१ ऑक्टोबर २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत भारतात मक्याची आवक मागील वर्षीच्या तुलनेत ११.३५ टक्के कमी झाली. सध्या बाजारात रब्बी मक्याची आवक मोठया प्रमाणात सुरु झाली आहे.




महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याच्या उत्पादनात २४ टक्के वाढ होईल असा अंदाज आहे त्यामध्ये मुख्यतः खरिपात मका उत्पादन सुमारे १४ टक्क्यांनी जास्त असेल, मात्र प्रतिकूल हवामानामुळे भारतातील गेल्या वर्षीच्या तुलनेत रब्बीमध्ये उतपादन २.४ टक्के कमी होईल.




मागील तीन महिन्यात नांदगाव बाजारात मक्याच्या किंमतीचा घसरता कल दिसून येतो. सध्या बाजारात रब्बी मक्याची आवक मोठया प्रमाणात सुरु झाली आहे.


**पुढील तीन महिन्यासाठी किंमत अंदाज पुढील प्रमाणे**

**माहे मे -२०२३ रुपये १७०० ते २१०० क्विंटल**


**माहे जून -२०२३ रुपये १८०० ते २२०० क्विंटल**

**माहे जुलै -२०२३ रुपये १८५० ते २२५० क्विंटल**


**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे. विदेशी व्यापार महासंचालनालय (DGFT) ने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तूरीसाठीचे -मुक्त आयात धोरण मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आले आहे.





तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२२-२३ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३६.६६ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी कमी असल्याचे दिसून येते तसेच महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन १६.५ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ८.५ लाख टनांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये आयात आणि निर्यात दोन्ही वाढले आहेत.




डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष मार्च २०२२-२३ मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत थोडी कमी झालेली दिसून येत आहे. एप्रिल २०२३ मध्ये (२२ एप्रिलपर्यंत) ती ४.५ लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत १५.१३ लाख टन इतकी होती




जून २०२२ पासून तुरीच्या किंमती वाढत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव जास्त आहेत.मागील तीन महिन्यातील अकोला बाजारपेठेतील तुरीच्या सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

फेब्रुवारी २०२३: रु. ७,२११/क्विंटल
मार्च २०२३: रु. ७,६७३/क्विंटल
एप्रिल २०२३ (२२ एप्रिल पर्यंत): रु. ८,००६/क्विंटल

सध्याच्या हंगामासाठी सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ६६००/क्विंटल) तुरीच्या किंमती जास्त आहेत.

## पुढील तीन महिन्यांसाठी संभाव्य किमतींचा अंदाज


**मे २०२३ : रु. ७,७००-८,३००/क्विंटल**

**जून २०२३: रु. ७,८००-८४००/क्विंटल**


**जुलै २०२३: रु. ७,९००-८,५००/क्विंटल**

# बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष — एप्रिल २०२३


**हरभरा:** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.





हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२२-२३ मध्ये हरभऱ्याचे उत्पादन सुमारे १३६ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते तसेच महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.२ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ३६.३९ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.मागील वर्षाच्या (२०२०-२१) तुलनेत २०२१-२२ मध्ये आयात आणि निर्यात दोन्ही घटले आहेत.




मागील वर्ष २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये आयात आणि निर्यात दोन्ही घटले आहेत.




मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष मार्च २०२२-२३ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत थोडी कमी झालेली दिसून येत आहे. एप्रिल २०२३ मध्ये (२२ एप्रिलपर्यंत) ती ३.३ लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत ४.३ लाख टन इतकी होती.




ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत. डिसेंबर २०२२ नंतर, त्या मागील वर्षातील किमतींपेक्षा जास्त आहेत.

मागील तीन महिन्यातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| फेब्रुवारी २०२३: | रु. ४७२४/क्विंटल |
| मार्च २०२३: | रु. ४६९९/क्विंटल |
| एप्रिल २०२३ (२२ एप्रिल पर्यंत): | रु. ४८१८/क्विंटल |

सध्याच्या रब्बी हंगामासाठी सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ५३३५/क्विंटल) हरभऱ्याच्या किंमती अजूनही कमी आहेत. रब्बी २०२३ मध्ये नाफेडने खरेदी केलेल्या हरभऱ्याचे एकूण प्रमाण खालीलप्रमाणे: (२७ एप्रिल २०२३ पर्यंत):

महाराष्ट्र : ५७००६३ मे.ट.

भारत: ९७२२१४ मे.ट.

## पुढील तीन महिन्यांसाठी संभाव्य किमतींचा अंदाज


**मे २०२३ : रु. ४,५००-४,८००/क्विंटल**

**जून २०२३: रु. ४,७००-५,०००/क्विंटल**


**जुलै २०२३: रु. ४,८००-५,२००/क्विंटल**

**[पुढील तीन महिन्यांत सरकारने हरभऱ्याच्या केलेल्या खरेदी नुसार किंमत अंदाज बदलू शकतात]**


**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो.





भारतात सन २०२२-२३ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२ दशलक्ष टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत जास्त आहे. मागील वर्षी (२०२१-२२) मध्ये ११.९० दशलक्ष टन उत्पादन झाले आहे. ( स्त्रोत: WASDE, USDA)





अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, जानेवारी- २०२३) अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात ३८८० लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ८ टक्केनी (३५८१ लाख टन, २०२१-२२) अधिक आहे.





सन २०२२-२३ मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. (स्त्रोत: SEA अहवाल).




सोयाबीन तेलाच्या आयातीच्या बाबतीत, भारताने नोव्हें. ते २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत १९.३४ लाख टन सोयातेल आयात केले. (स्त्रोत: SEA अहवाल).




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात सोयाबीनची मासिक बाजारात आवक जास्त आहे. ( स्त्रोत: Agmarknet)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत. ( स्त्रोत: Agmarknet)

मागील तीन महिन्यांतील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

**फेब्रुवारी २०२३** :रु. ५१२९ प्रती क्विं.
**मार्च २०२३** : रु. ५१११ प्रती क्विं.
**एप्रिल २०२३ ( २४ तारखेपर्यंत)** : रु. ५१५४ प्रती क्विं.


सध्याच्या किंमती या खरीप २०२२-२३ हंगामासाठी जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमती (रु.४३००) पेक्षा जास्त आहेत.

## पुढील तीन महिन्यांसाठी संभाव्य किमतींचा अंदाज


**मे २०२३ : रु. ४८०० ते ५३०० प्रती क्विं.**
**जून २०२३: रु. ४९०० ते ५४०० प्रती क्विं.**
**जुलै २०२३: रु. ५००० ते ५५०० प्रती क्विं.**
सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.

# कापूस


कापूस हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी 25% वाटा भारताचा आहे आहे.





गेल्या वर्षी 14 वर्षांमधील नीचांकी उत्पादनावर गेल्यानंतर, भारतातील कापूस पीक 337 लाख गाठी म्हणजे गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या तुलनेत 26 लाख गाठींनी जास्त असल्याचा अंदाज आहे.





'यूएस डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर' ( USDA) ने सुधारित जागतिक कापूस ताळेबंदात कमी उत्पादन , वापर, व्यापार आणि शेवटचा साठा समाविष्ट केला आहे. गेल्या महिन्याच्या तुलनेत 1.6 दशलक्ष गाठींचे उत्पादन कमी झाले आहे. (स्रोत:




राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत , मागील वर्षाच्या तुलनेत 2022-23 मध्ये आयातीत 55% वाढ आणि निर्यातीत 23% घट होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीवर दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयातीत 3.84% वाढ आणि निर्यातीत 1.81% घट झाली आहे.




मार्च महिन्यात बाजारात कापसाची आवक गतवर्षीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे.




गेल्या चार महिन्यांपासून राजकोटच्या बाजारपेठेत कापसाचे भाव थोडे कमी होत आहेत.


**पुढील तीन महिन्यांसाठी संभाव्य किमतींचा अंदाज**

**मे २०२३ : रु. ७,५००-८,५०० /क्विंटल**


**जून २०२३: रु. ७,६००-८,६०० /क्विंटल**

**जुलै २०२३: रु. ७,५००-८,५००/क्विंटल**


**कांदा:** कांदा (ॲलियम सेपा एल.) हे भारतातील विविध भागांमध्ये घेतले जाणारे एक महत्त्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा भारतीय आहारातील सर्वात महत्त्वाच्या वस्तूंपैकी एक आहे. लोकसंख्या वाढीमुळे कांद्याचा वापर वाढत आहे. कांदा पिक नाशवंत असल्याने किमतीत मोठ्या प्रमाणात चढ-उतार होताना दिसून येतात. भारत हा जगातील दुसरा क्रमांकाचा कांदा उत्पादक देश असून एकूण जागतिक उत्पादनात २०% वाटा आहे (FAO, २०२०). भारतात खरीप व रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. खरीप आणि लेट खरीप हंगामातील मिळून उत्पादनाचा एकूण कांद्याच्या उत्पादनात सुमारे ६० टक्के वाटा आहे. खरीप हंगामातील उत्पादन ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यात बाजारात येते. रब्बी कांदा पिकाची विक्री एप्रिल ते जून दरम्यान केली जाते.





मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी (२०२२-२३) भारतात कांद्याच्या उत्पादनात वाढ झाली आहे. मागील वर्षी ३११.२ लाख टन उत्पादन झाले होते. सन २०२२-२३ मध्ये ३१८.० लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे.





सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात कांद्याचे १३३.४९ लाख टन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. मागील वर्षी सन २०२१ -२२ मध्ये १३६.६८ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. (स्रोत: फलोत्पादन संचालनालय, GoM).




२०२२-२३ मध्ये कांद्याची निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत जास्त आहे. एप्रिल २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधी पेक्षा कांद्याची निर्यात एप्रिल २०२२ ते जानेवारी २०२३ या कालावधीत ५९ टक्क्यांनी जास्त झाली आहे. ( स्रोत : APEDA)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात कांद्याची मासिक आवक जास्त आहे. ( स्रोत: AGMARKNET)




चालू वर्षी कांद्याच्या किंमती या मागील वर्षीच्या तुलनेत कमी आहेत. मागील तीन महिन्यांतील कांद्याच्या सरासरी किमती पुढीलप्रमाणे:

**फेब्रुवारी २०२३** : रु. ८३८ प्रती क्विं.
**मार्च २०२३** : रु. ७४३ प्रती क्विं.
**एप्रिल २०२३ (२४ तारखेपर्यंत)** : रु. ६३५ प्रती क्विं.
(स्त्रोत: AGMARKNET)

## पुढील तीन महिन्यांसाठी संभाव्य किमतींचा अंदाज-

**मे २०२३ : रु. ७०० ते ११०० प्रती क्विं.**
**जून २०२३: रु. ७५० ते ११५० प्रती क्विं.**
**जुलै २०२३: रु. ८०० ते १२०० प्रती क्विं.**

सदर अहवाल हा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यीत, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पातील, बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी अंतर्गत तयार करण्यात आलेला आहे. या अहवालामध्ये मका, तूर, हरभरा, सोयाबीन, कापूस आणि कांदा या सहा शेतमालाचा समावेश आहे.


अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष**

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,
सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६
फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री नं.: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com, वेबसाईट:

https://www.smart-mh.org/